नि.फौ.ख.क्र. १४४/२०२५
सरकार वि. राजेश
नि.क्र.१०

सरकारतर्फे साक्षदार क्रमांक २ यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करते कि
नाव - अशिष माहदेव मेश्राम,
वय - २५ वर्ष, व्यवसाय – खाजगी नोकरी,
राहणार – अडेगाव, ता. मौदा, जिल्हा - नागपूर.

**सरतपास शपथेवर सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता श्रीमती एस.व्ही. रामटेके मार्फत**

१. मी आरोपीला ओळखत नाही. दि.२९.१२.२०२४ रोजी पोलीसांनी मला पंचनामा करीता समंस दिले होते. आता मला सदरचे समंस दाखवण्यात आले. त्यातील मजकूर मला माहिती नाही. त्यावर माझी सही अनुक्रमांक २ वर आहे. सदर समंस वरील सहीला **नि.क्र.११** देण्यात येत आहे.

२. आता मला नि.क्र.९ वरील घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. तो माझ्या समक्ष तयार केला होता. सदर पंचनाम्यांवर मी वाचून सही केली होती. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही अनुक्रमांक २ आहे. त्यावेळेस माझ्यासोबत एक दुसरा पंच हजर होता. पोलीसांनी माझ्या समक्ष निळ्या रंगाचा सोनालीका ट्रॅक्टर ज्यामधे रेती होती व एक स्प्लेंडर मो.सा. जप्त केली होती.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीचे वकिल श्री.ए.एस. रेवतकर यांच्या मार्फत –**

३. मी खाजगी नोकरीवर मौजा गुमगाव, ता. हिंगणा येथे आहे. मी घटनास्थळी उभा होतो. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ व जप्ती पंचनामा पोलीसांनी तयार केला होता व त्यांनी म्हटले म्हणून मी त्यावर सही केली होती. घटनास्थळी मी १० ते १५ मि. थांबलो होतो. मी घटनास्थळी ०४.०० वा थांबलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, दुसरा पंच माझा मित्र आहे.

**उलटतपास संपला**

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत.
मौदा.
दिनांक. ११.१२.२०२५

समक्ष
**स्वाक्षरी/-**
(एन.के. वानखडे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग मौदा